## "स्थानीय व्यवस्थापन समिती"ची सभा दिनांक १ सप्टेंबर २०१८.

१६. आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या स्थानीय व्यवस्थापन समितीची सभा दिनांक १ सप्टेंबर २०१८ला शनिवारी प्रातः ११ वाजता 'महारोगी सेवा समिती वरोरा'चे मध्यवर्ती कार्यालय आनंदवन येथे माननीय डॉ. विकासभाऊ आमटे यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली.

या सभेस खालील प्रमाणे गणमान्य सभासद उपस्थित होते.

| अ.क्रं. | सर्वश्री शुभ नाम | | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | आदरणीय डॉ. विकासभाऊ आमटे | अध्यक्ष | |
| २ | डॉ. शीतल आमटे-करजगी | सदस्य | |
| ३ | श्री गौतम शिरिष करजगी | सदस्य | |
| ४ | डॉ. दिलीप रामकृष्ण पेशवे | सदस्य | |
| ५ | डॉ. विजय गोविंद पोळ | सदस्य | |
| ६ | श्री. सुधाकर विठोबाजी कडू | सदस्य | |
| ७ | प्रा. विजय शंकरराव धाबर्डे | शिक्षक प्रतिनिधी | |
| ८ | डॉ. संजय नारायणराव साबळे | —॥— | |
| ९ | प्रा. बबन बळीरामजी अवघडे | —॥— | |
| १० | श्री. हरी फकरुजी खुडसंगे | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी | |
| ११ | डॉ. मृणाल चंद्रकांत काळे | प्राचार्य तथा सचिव स्थानीय व्यवस्थापन समिती | |

### — सभाध्यक्षपदी निवड —

उपस्थित गणमान्य सभासदांनी सर्वमताने सभाध्यक्ष पदी माननीय डॉ. विकासभाऊ आमटे यांची निवड केली.

### — स्वागत व ऋण निर्देश —

डॉ. मृणाल चंद्रकांत काळे, प्राचार्य व सचिव, स्थानीय व्यवस्थापन समिती, आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, आनंदवन-वरोरा यांनी उपस्थितांचे शब्दसुमनांनी यथोचित स्वागत केले.

महाविद्यालयाच्या दैनंदिन व्यवहार, विस्तार व सर्वोतपरी सहकार्या बाबत व्यवस्थापनाचे आभार मानले. केवळ व्यवस्थापनाचे सहकार्य, बहुमुल्य मार्गदर्शन याची फलश्रुती म्हणजे वर्तमानातील महाविद्यालयाची सर्वांगीण होत असलेली नेत्रदिपक प्रगती होय. महाविद्यालयास सर्वोच्च स्तरावर नेण्यासाठी भविष्यात सुध्दा असेच सहकार्य, मार्गदर्शन यांची नितांत गरज व खात्री आहे. धन्यवाद.

ठरावक्र. १ मागील सभेच्या ईतिवृत्तास मंजूरी देणे.
मागील सभा दि. २० नोव्हेंबर २०१७ रोजी म.से.स. वरोराच्या मुख्य कार्यालय येथे मा. डॉ. विकासभाऊ आमटे यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतीवृत्ताच्या छायाप्रती सभासदांना पुरविण्यात आल्या.

"मागील सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर"

ठरावक्र. २. आर्थिक वर्ष २०१७-२०१८ चे आयव्यय पत्रकास मंजूरी देणे.
आर्थिक वर्ष २०१७-२०१८ चे अंकेक्षित लेखे 'आयव्यय, जमाखर्च पत्रक व ताळेबंद' सभे समोर सादर केले. चर्चा सुचनांचे आदानप्रदान झाले

"आर्थिक वर्ष २०१७-२०१८ चे आयव्यय पत्रक सर्वानुमते मंजूर"

ठराव क्र. ३. आर्थिक वर्ष २०१८-२०१९ चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
आर्थिक वर्ष २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक सभे समोर सादर केले. सर्वांगीण चर्चे नंतर अंदाजपत्रक मंजूरीस पात्र समजण्यात आले.

"आर्थिक वर्ष २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर"

ठराव क्र. ४ वेतन व वेतनविषयक कार्यवाहीस मंजूरी देणे

अ.] सेवानिवृत्ती प्रकरणे
चालू सत्रात महाविद्यालयातील पुढील २ कर्मचारी सेवानिवृत्त झाले.
१) डॉ. विवेक दिनकर भांदककर सहयोगी प्राध्यापक दि. ३० जून २०१८
२) श्री रमेश लटारी मेश्राम प्रयोगशाळा सहाय्यक दि. ३० जून २०१८
उपरोक्त प्रकरणातील महाविद्यालयाचे वतीने करावयाची कार्यवाही पूर्ण झाली.

"प्राचार्यांचे कार्यवाहीस सर्वानुमते मंजूरी प्रदान"

ब.] अतिरिक्त प्रदान वेतनाची वसुली
अंकेक्षित लेखे वर्ष 2015-2016 मध्ये दर्शविलेली रु. 96913
अंकेक्षित लेखे वर्ष 2016-2017 मध्ये दर्शविलेली रु. 149573
अतिरिक्त अनुदान मार्च 2017 चे वेतनात प्राप्त रु. 14825
अतिरिक्त अनुदान कालबध्द पदोन्नती द्वारे रु. 14087
अतिरिक्त अनुदान कालबध्द पदोन्नती द्वारे रु. 22772
व डॉ. मिलींद शंकरराव देशपांडे यांचे कडून वसूल केलेले रु. 79412/-

फ.] प्राचार्यांनी घेतलेल्या आर्थिक निर्णयास मंजूरी प्रदान करणे.
सत्र २०१७-२०१८ मध्ये खरेदी पुढील प्रमाणे झाली.
प्रयोगशाळे करिता उपकरण खरेदी.
वरीष्ठ महाविद्यालय रु. 5,30,648/- विद्यापीठ अनुदान आयोग रु.२,19,522/-
व पदव्युत्तर विभाग रु. 1,42,294/- एकुण खरेदी. रु. 8,92,464/-

ग्रंथालय पुस्तके खरेदी
वरीष्ठ महाविद्यालय रु. 1,16,004/- व विद्यापीठ अनुदान आयोग रु. 11,675/-
एकूण खरेदी रु. 1,27,679/-

उपस्कर व ईतर चल संपत्ती खरेदी.
वरीष्ठ महाविद्यालय रु. 4,81,558/- विना अनुदानित तत्वा वरील पदवी विभाग
रु. 296640/- व पदव्युत्तर विभाग रु. 1,45,240/- एकूण रु. 9,23,438/-
मूल्यांची विधीवत खरेदी केली

"प्राचार्यांनी घेतलेल्या आर्थीक निर्णयास मंजूरी देण्यात येत आहे"

विना अनुदान तत्वावर पदव्युत्तर विभागात नवीन विषय सुरु करण्याबाबत.
महाविद्यालयात विना अनुदान तत्वावर एम. ए. ईंग्रजी, मराठी, समाजशास्त्र,
राज्यशास्त्र, इतिहास व अर्थशास्त्र या विषयात नव्याने सूरु करण्याबाबत यथा
शिघ्र कार्यवाही करण्यात यावी. एम.कॉम ईंग्रजी माध्यम वर्ग सूरु करावे.
"ठराव सर्वानुमते मंजूर"

महाविद्यालयीन कामात असहकार वृत्ती संदर्भाने कार्यवाही.
उपरोक्त शिर्षाच्या अनुषंगाने डॉ. एम. एच. दुर्गे यांचे कडून रास्त वर्तनाची जबाबदारी
प्रा. बी. बी. अवघडे यांनी घेतली आहे. सदर प्रकरणात १ महिना कालावधीत
रास्त सुधारणा न झाल्यास सर्व नियमांचे अधिन राहून कार्यवाही करावी.

स्वाक्षरी
(signature)
अध्यक्ष
स्थानिय व्यवस्थापन समिती

स्वाक्षरी
(signature)
प्राचार्य /सचिव
आ. नि. म. स्था. व्य. स.